# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ प्रभाग समिती

## सभावृत्तांत

## कार्यपत्रिका क्रमांक ८

दिनांक: १२/११/२०१४ वेळ: दुपारी १२.०० वाजता

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे नोव्हेंबर २०१४ ची मासिक सभा बुधवार दिनांक १२/११/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील "राजमाता जिजाऊ सभागृह" येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/ सदस्या उपस्थित होते.

१. मा. सौ.सुभद्रा ईश्वर ठोंबरे - सभापती
२. मा. बाबर शारदा प्रकाश
३. मा. भारती फरांदे
४. मा. आर.एस. कुमार
५. मा. जावेद रमजान शेख
६. मा. भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
७. मा. पांढरकर निलेश शंकरराव
८. मा. राजू मिसाळ
९. मा. नंदा विकास ताकवणे
१०. मा. तरस बाळासाहेब जयवंत
११. मा.सौ. काळभोर वैशाली जालिंदर
१२. मा.सौ. साळुंके सविता सुरेश

याशिवाय श्री. प्रशांत खांडकेकर-क्षेत्रीय अधिकारी, श्री. शेख फारुख, - कार्यकारी अभियंता स्थापत्य, श्री.मिलींद कपिले - कार्यकारी अभियंता विद्युत, श्री.वसंत काची- कार्यकारी अभियंता जलनि:सारण, श्रीम.रेखा गाडेकर - प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्री. प्रदिप पुजारी - उपअभियंता – स्थापत्य/ झोनिपु, श्री.सुनिल वाघुंडे, श्री.अनिल शिंदे, श्री.वैभव पुसाळकर - उपअभियंता स्थापत्य, श्रीम. लता बाबर- उपअभियंता विद्युत, श्री.मोहन करमरकर, श्रीम.झेड.मोमिन -उपअभियंता पाणीपुरवठा, श्री.पांडूरंग जाधव-लेखाधिकारी, श्री.शिंदे एस.जी., श्री.जन्नु आर.टी.- कनिष्ठ अभियंता नगररचना, श्री.कुलकर्णी ए.ए., श्री.बंडगर एस.बी.– कनिष्ठ अभियंता जलनि:सारण, श्री.डी.जे. शिर्के – मुख्य आरोग्य निरीक्षक निरीक्षक, श्री.पी.यू.गायकवाड - उद्यान अधिक्षक, श्री.आर.बी.निकाळजे – उद्यान पर्यवेक्षेक (हॉर्टी.) इत्यादी अधिकारी उपस्थित होते.

मा.सभापती यांनी उपस्थित सन्माननीय नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करुन सभा सुरु करणेस अनुमती दिली.

मा.सभापती यांचे परवानगीने खालीलप्रमाणे ऐनवेळेचे विषय सभा कामकाजात समाविष्ट करण्यात आले.

विषय क्र. ३ मा.शरद उर्फ राजू मिसाळ यांचा प्रस्ताव
चौकाचे व रस्त्याचे नामकरण करणेबाबत.

विषय क्र. ४ मा.प्रतिभा ज्ञानेश्वर भालेराव यांचा प्रस्ताव
रस्त्यावर डिव्हायडर बसविणेबाबत.

विषय क्र. ५ मा.प्रतिभा ज्ञानेश्वर भालेराव यांचा प्रस्ताव
मुतारीसाठी पाण्याची टाकी बसविणे व रस्त्याचे सुशोभीकरण करणेबाबत.

विषय क्र. ६ मा.मोरेश्वर महादू भोंडवे यांचा प्रस्ताव
मुकाई चौकातून किवळे गावठाण रस्त्यालगतचे अंडरपासचे नामकरण करणेबाबत.

विषय क्र. ७ मा.मोरेश्वर महादू भोंडवे यांचा प्रस्ताव
उड्डाणपुलाचे नामकरण करणेबाबत.

विषय क्र. ८ मा.मोरेश्वर महादू भोंडवे यांचा प्रस्ताव
वस्तीचे नामकरण करणेबाबत.

विषय क्र. ९ मा.सविता सुरेश साळुंके यांचा प्रस्ताव
रस्त्याचे नामकरण करणेबाबत.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ३९ | विषय क्रमांक | : १ |
| दिनांक | : १२/११/२०१४ | विभाग | : प्रशासन/ लेखा |
| सुचक | : मा. राजू मिसाळ | अनुमोदक | : मा. बाबर शारदा प्रकाश |

संदर्भ: मा. क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील पत्र क्रमांक
अक्षेका/ प्रशा-११/कावि/१०७/२०१४ दि. २०/०९/२०१४

अ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील एफआरपी कॅबीन व दैनंदिन वृत्तपत्राची बील “सार्वजनिक वाचनालयाची वृत्तपत्राची बीले” या लेखाशिर्षावरुन खर्ची टाकणेत येतात. सदर लेखाशिर्षावर सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात र.रु.२,५०,०००/- तरतुद करण्यात आली असून त्यापैकी दिनांक १९/०९/२०१४ अखेर र.रु.२,४८,४४७/- खर्च झालेला असून र.रु.१,५५३/- शिल्लक आहे. चालू आर्थिक वर्षातील एफआरपी कॅबीन व दैनंदिन वृत्तपत्राची बील अदा करणेकामी र.रु.२,८०,०००/- ची तरतुद आवश्यक असलेने “मनपा मिळकतीची पाणीबीले” या लेखाशिर्षावरील र.रु. १,००,००,०००/- (र.रु. एक कोटी) पैकी र.रु.३,००,०००/- (र.रु.तीन लाख) “सार्वजनिक वाचनालयाची वृत्तपत्राची बीले” या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ४० | विषय क्रमांक | : २ |
| दिनांक | : १२/११/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. आर.एस.कुमार | अनुमोदक | : मा. भारती फरांदे |

संदर्भ: मा.भारती फरांदे यांचे पत्र दिनांक ५/११/२०१४
मा.आर.एस.कुमार यांचे पत्र दिनांक १२/११/२०१४

प्रभाग क्रमांक १४ मधील दक्षिणमुखी मारुती, एल.आय.जी.कॉलनी, सिंधूनगर येथे राहणारे सामाजिक कार्यकर्ते कै.चंद्रकांत गोविद एखंडे यांचे घरालगत असलेल्या रस्त्याला “कै.चंद्रकांत गोविद एरवंडे” यांचे नाव देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ४१ | विषय क्रमांक | : ३ |
| दिनांक | : १२/११/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. शरद उर्फ राजू मिसाळ | अनुमोदक | : मा. नंदा विकास ताकवणे |

संदर्भ: मा.शरद उर्फ राजू मिसाळ यांचा प्रस्ताव

सेक्टर २८ मधील कुपर कॉलनीमधील चौकास “राशीनकर दत्त मंदिर चौक” व किर्ती हौसिंग सोसायटी शेजारील चौकास “जानकी वाचनालय चौक” असे नामकरण करणेस तसेच महादेव मंदिराकडे, वीर सावरकर उद्यानाकडे, गणेश तलावकडे, तहसिल व ना.सु.के. दुय्यम सहाय्यक निबंधक कार्यालयाकडे, श्री.खंडोबा ओझराई देवी मंदिर, रामाडी डोंगर रावेत (MIDC) कडे, डि.वाय.पाटील कॉलेजकडे, पिंपरी चिंचवड पोलिटेक्निक कॉलेजकडे या प्रमाणे प्रत्येकी दोन बोर्ड तयार करुन लावणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ४२ | विषय क्रमांक | : ४ |
| दिनांक | : १२/११/२०१४ | विभाग | : स्थापत्य /पाणीपुरवठा |
| सुचक | : मा. प्रतिभा ज्ञानेश्वर भालेराव | अनुमोदक | : मा. जावेद शेख |

संदर्भ: मा. प्रतिभा ज्ञानेश्वर भालेराव यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक १६ आकुर्डी गावठाणातील पांडुरंगबुवा काळभोर सभागृहावर पाण्याची टाकी बसविणेस तसेच म्हाळसाकांत चौक ते रेल्वेलाईन पर्यंत व रेल्वेलाईन ते पंपींग स्टेशन पर्यंतचे रस्त्यावर डिव्हायडर बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ४३ | विषय क्रमांक | : ५ |
| दिनांक | : १२/११/२०१४ | विभाग | : स्थापत्य / पाणीपुरवठा |
| सुचक | : मा. प्रतिभा ज्ञानेश्वर भालेराव | अनुमोदक | : मा. जावेद शेख |

संदर्भ: मा. प्रतिभा ज्ञानेश्वर भालेराव यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक १६ आकुर्डी गावठाण भागात मुख्य चौकात मारुती, गणपती, विठ्ठल रुक्मीणी मंदिरालगत तालीम जवळ असलेल्या सार्वजनीक मुतारीसाठी पाण्याची टाकी बसविण्यास तसेच जवळच्या वडाच्या झाडोभोवती व मारुती मंदिरा पर्यंत रंगित फरशा बसवून चौक सुशोभीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ४४ | विषय क्रमांक | : ६ |
| दिनांक | : १२/११/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा.मोरेश्वर महादू भोंडवे | अनुमोदक | : मा. राजू मिसाळ |

संदर्भ: मा.मोरेश्वर महादू भोंडवे यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक १९ वाल्हेकरवाडीत रावेत किवळे येथील मुकाई चौकातुन डाव्या साईडला किवळे गावठाणात जातांना मुंबई-बेंगलोर हायवेला असलेल्या अंडरपासला “श्री.बापदेव महाराज अंडरपास ब्रिज” असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ४५ | विषय क्रमांक | : ७ |
| दिनांक | : १२/११/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा.मोरेश्वर महादू भोंडवे | अनुमोदक | : मा. बाळासाहेब तरस |

संदर्भ: मा.मोरेश्वर महादू भोंडवे यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक १९ वाल्हेकरवाडीत मुंबई-बेंगलोर हायवेवर रावेत हद्दीत उड्डाणपुलाचे काम अंतिम टप्प्यात असून सदरचे उड्डाणपुलास “श्रीकमळजाईमाता अंडरपास ब्रिज” असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक : ४६ विषय क्रमांक : ८
दिनांक : १२/११/२०१४ विभाग : स्थापत्य
सुचक : मा.मोरेश्वर महादू भोंडवे अनुमोदक : मा. बाळासाहेब तरस

संदर्भ: मा.मोरेश्वर महादू भोंडवे यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक १९ मधील किवळे भागातील तरस वस्तीस “नगरसेवक तरस वस्ती” असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक : ४७ विषय क्रमांक : ९
दिनांक : १२/११/२०१४ विभाग : स्थापत्य
सुचक : मा. सविता सुरेश साळुंके अनुमोदक : मा. भारती फरांदे

संदर्भ: मा. सविता सुरेश साळुंके यांचा प्रस्ताव

मोरवाडी प्रभाग क्रमांक २७ मध्ये श्रद्धा हेरिटेज सोसायटी जवळील रस्त्यास “कै.भिकू दगडू कापसे पथ” असे नामकरण करणेस तसेच मोरवाडीतील ममता स्विट मार्ट समोरील अजमेरा कॉलनीकडे जाणा-या रस्त्यास “कै.महादेव बाळू साळुंके पथ” असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

(सौ.सुभद्रा ईश्वर ठोंबरे)
सभापती
अ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रीय कार्यालय, निगडी-४४
अक्षेका /११/कावि/ ३११ /२०१४
दिनांक : ११ /१२ /२०१४

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती